# // प्रकरण : २ रे : //

प्रकरण : २ रे

## // प्रस्तावना, संशोधनाचा विषय, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची मर्यादा व व्यापी //

२.१ : प्रस्तावना.

२.२ : संशोधनाचा विषय.

२.३ : संशोधनाची उद्दिष्टे.

२.४ : संशोधनाची मर्यादा व व्याप्ती

२.५ : प्रकरणाचे सुसूत्रीकरण.

प्रकरण : २ रे

## २.१ : // प्रस्तावना //

प्राचीन काळापासून सध्या आपण वाटचाल करित असलेल्या २१ व्या शतकाकडे आणि विज्ञान व आधुनिक युगापर्यंत जर आपण भूगोलाच्या अध्यापनाचा आठावा घेतला आणि प्रगती पाहिली तर ती आपणांस समाधानकारक वाटत नाही. भूगोलामध्ये असणा-या संज्ञा, संबोध, संकल्पना कार्यकारणभाव घटना आणि घटक यांचा परस्परसंबंध प्रात्यक्षिक कार्य, क्षेत्रीय कार्य, इत्यादी गोष्टीवर म्हणावे तेवढेकलक्ष दिले जात नाही. त्याचप्रमाणे भौगोलीक घटकांची उपलब्धता आणि त्यांचा उपयोग याकडे असणारे दुर्लक्ष व त्यामुळे भेडसावणा-या समस्या यांचा परिणाम आपण आजही पहात आहोत उदा. अन्नधान्य समस्या राहत्या घराची समस्या, रोजगार, वस्त्रस्त्रे इत्यादी त्यामुळे उपलब्ध असणा-या नैसर्गीक भौगोलीक परिस्थितीवर मात करून आपले जिवन अधिक सुखकारक करण्यासाठी भौगोलीक ज्ञानाची आवश्यकता आहे. आणि हे भौगोलीक ज्ञान आपणाला भूगोलाच्या अध्यापनाने आजभावता येते. त्यासाठीच अभ्यासकांनी खालील विषय अभ्यासासाठी निवडलेला आहे.

## २.२ : // संशोधनाचा - विषय //

" सन १९८८-८९ सालामधील बार्शी तालुक्यातील कांही निवडक माध्यमिक शाळेतील आठव्या इयत्तेच्या भूगोल अध्यापनाचा चिकित्सक अभ्यास. "

## २.३ : // संशोधनाची उद्दिष्टे //

[illegible]

खालील उद्दिष्टांना अनुसरून अभ्यासकांनी निवडलेल्या वरील विषयासंबंधी माहिती संकलित केलेली आहे.

१] आठव्या इयत्तेला भूगोल हा विषय शिकविताना शिक्षक कोणता अध्यापन पध्दतीचा वापर करतात त्याचा अभ्यास करणे.

२] संशोधनासाठी निवडलेल्या १७ माध्यमिक शाळेत उपलब्ध असणारी शैक्षणीक साधने कोणती आहेत आणि त्यापैकी कोणत्या शैक्षणीक साधनांचा वापर शिक्षक आठव्या इयत्तेच्या अध्यपनासाठी करतात त्याचा अभ्यास करणे.

३] आठव्या इयत्तेला भूगोल हा विषय शिकवत असणाऱ्या शिक्षकांची शैक्षणीक पात्रता, त्यांचे विषयज्ञान, आणि त्यांचा अध्यापनाचा अनुभव याविषयी माहिती जाणून घेणे.

४] आठव्या इयत्तेला भूगोल हा विषय शिकवत असताना शिक्षक इतर विषय शिक्षकांशी सहसंबंध साधतात किंवा काय याचा अभ्यास करणे.

५] भूगोल शिक्षक अध्यापन करीत असताना स्थानिक पर्यावरणाची मदत घेवून दिलेला अभ्यासक्रम शिकवितात किंवा काय याचा अभ्यास करणे.

६] आठव्या इयत्तेसाठी दिलेले भौगोलीक प्रात्यक्षीक कार्य, व क्षेत्रीय अध्यापन करित असताना घेतले जाते किंवा काय याचा अभ्यास करणे.

७] शिक्षक अध्यापन करित असताना कोणती भौगोलीक कौशल्ये शिकवतात त्याचा अभ्यास करणे.

८] भूगोलाचे अध्यापन करित असताना शैक्षणीक सहलीचा अवलंब करतात काय याचा अभ्यास करणे.

९] निवडलेल्या माध्यमिक शाळांतील आठव्या इयत्तेच्या भूगोल विषयाच्या निकालाचा अभ्यास करणे.

१०] भूगोल विषयाच्या अध्यापना संबंधी योग्य त्या सुधारणा करण्यासाठी सूचना करणे.

===================

२.४. : // संशोधनाची मर्यादा व व्याप्ती //

१] अभ्यासकाने फक्त बार्शी तालुक्यातील आठव्या इयत्तेच्या भूगोल अध्यापनाच्या चिकित्सक अभ्यासासाठी स.नं. १९८८-८९ वर्षातील १७ निवडक माध्यमिक शाळा निवडलेल्या आहेत. त्याचे स्थान दर्शविणारा नकाशा सोबत पान.नं. ४ वर दिलेला आहे.

२] अभ्यासकानी अल्यासाठी ग्रामीण भागातील एकूण ११ शाळा, व शहरी भागातील एकूण ६ शाळा निवडलेल्या आहेत. त्यातही पुन्हा ग्रामीण भागातील मुलांचे १, मुलींची १, व मिश्र ९ शाळा घेतलेल्या आहेत. तसेच शहरी भागातील एकूण ६ शाळांपैकी मुलांची १, मुलींची १, व मिश्र ४ शाळा निवडलेल्या आहेत. त्या सर्व शाळाचे वर्गीकरण दर्शविणारे कोष्टक क्र. परिशिष्टात पहावे.

३] संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण १७ शाळांमधुन उपलब्ध असणा-या एकूण २३८ वर्गापैकी आठवीच्या एकूण ४९ तुकडया अभ्यासासाठी घेतलेल्या आहेत.

४] अभ्यासकानी निवडलेल्या आठवीच्या एकूण ४९ इयत्तांना सर्व १७ शाळामधून एकूण ३९० शिक्षकांपैकी फक्त ३२ शिक्षक भूगोल हा विषय -

शिकवत असल्याचे दिसून आलेले आहे. त्याची शाळावार माहिती दर्शविणारे कोष्टक क्र. परिशिष्ठात पहावे.

५] अभ्यासकानी अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण १७ माध्यमिक शाळामधून एकूण विद्यार्थी व विद्यार्थीनी मिळून संख्या ११६४७ आहे त्यापैकी अभ्यासासाठी घेतलेल्या आठव्या इयत्तेच्या विद्यार्थी व विद्यार्थीनीची एकूण संख्येचा शाळावार तक्ता दर्शविणारे कोष्टक क्र परिशिष्ठात पहावे.

६] अभ्यासासाठी निवडलेल्याएकूण १७ शाळांमध्ये असणा-या ११६४७ विद्यार्थ्यांमध्ये मुलांची संख्या ७४६४ व मुलींची एकूण संख्या ४१८३ आहे. निवडलेल्या एकूण शाळातील मुलामुलींची एकूण संख्या त्यांचे शेकडा प्रमाण दर्शविणारे कोष्टक क्र. परिशिष्ठात पहावे.

७] निवडलेल्या एकूण ११६४७ विद्यार्थ्यामध्ये सन. १९८८-८९ या वर्षात एकूण ग्रामीण विभागातील मुले व मुली मिळून ७६०८ संख्या आहे. आणि शहरी विभागातील एकूण संख्या ४०३९ आहे. एकूण संख्येतील शहरी व ग्रामीण विभागातील विद्यार्थी संख्या आणि त्यांचे शेकडा प्रमाण दर्शविणारे कोष्ठक क्र. परिशिष्ठात दिलेले आहे.

८] अभ्यासकानी निवडलेल्या सन. १९८८-८९ या वर्षातील १७ माध्यमिक शाळामध्ये उपलब्ध असणा-या एकूण २३८ वर्गापैकी उपलब्ध असणा-या फक्त आठव्या इयत्तेच्या ४९ वर्गातून एकूण २४४७ संख्येमध्ये मुलांची संख्या १६४० आहे तर मुलींची संख्या फक्त ८०७ एवढीच आहे. आठवीतील मुलामुलींची शाळांवर संख्या आणि त्यांचे शेकडा प्रमाण दर्शविणारे कोष्टक क्र. परिशिष्ठात पहावे.

९] सन. १९८८-८९ या वर्षासाठी निवडलेल्या बार्शी तालुक्यातील एकूण १७ शाळांमध्ये फक्त आठवीच्या ४९ वर्गात असणा-या २४४७ संख्येत एकूण -

ग्रामीण भागातील संख्या १८०८ आहे व शहरी भागातील संख्या ६३९ असल्याचे दिसून आलेले आहे. आठवीतील एकूण संख्येत असणारे ग्रामीण व शहरी विभागातील मुलामुलींचे शेकडा प्रमाण आणि संख्या दर्शविणारे कोष्टक क्र. परिशिष्टात पहावे.

१०] अभ्यासकानी निवडलेल्या विषयाला अनुसरून फक्त सन. १९८८-८९ या वर्षापुरताच मर्यादीत कालावधीचा अभ्यास केलेला आहे.

## २.५ : // प्रकरणाचे सूत्रीकरण //

प्रश्नावली, मुलाखती, निवडलेल्या सर्व शाळांना भेटी, निरीक्षण, चर्चा व प्रकाशित साहित्य या द्वारे अभ्यासकाने माहिती मिळविली नंतर पृथ:करण व अर्थनिर्वचन करून अभ्यासकाने कांही निष्कर्ष काढून शिफारशी केल्या आहेत हे सर्व सहा प्रकरणांत खालील प्रमाणे सादर केले आहे.

प्रकरण १ ले : या प्रकरणात प्रस्तावना, विषयप्रवेश, संशोधनाची गरज, संशोधनाचे महत्त्व याची माहिती दिली आहे.

प्रकरण २ रे : प्रस्ताविक, संशोधनाचा विषय, संशोधनाची उद्दिष्टे संशोधनाची मर्यादा, व व्याप्ती, आणि प्रकरणाचे सुसूत्रीकरण याची माहिती दिली आहे.

प्रकरण : ३ रे : अशाच प्रकारच्या संबधीत संशोधनाचा अभ्यास त्यांची कार्यपध्दती, निष्कर्ष, शिफारशी, प्रस्तुत संशोधनाची कार्यपध्दती व साधने या बाबी या प्रकरणात दिलेल्या आहेत.

प्रकरण : ४ थे : या प्रकरणात प्रास्ताविक, संशोधकाने निवडलेली संशोधनपध्दती, संशोधनासाठी निवडलेली साधने, प्रश्नावली मुलाखती, निरीक्षण, चर्चा यांची माहिती व कार्य पध्दती याची माहिती आहे.

प्रकरण : ५ वे : [अ] या प्रकरणात मुख्याध्यापकांनी भरून दिलेल्या प्रश्नावलीच्या अधारे मिळालेल्या माहितीचे पृथःकरण व अर्थनिर्वचन केलेले आहे.

[ब] यामध्ये आठवीला भूगोल शिकविणा-या शिक्षकांनी भरून दिलेल्या प्रश्नावलीतील माहितीचे पृथःकरण व त्याअधारे त्याचे अर्थनिर्वचन केलेले आहे.

[क] या प्रकरणात निवडलेल्या शाळांतील आठवीच्या ५ भूगोल शिक्षकांची, ५ मुख्याध्यापकांची व ५ भूगोल तज्ञांच्या घेतलेल्या मुलाखतीचे, अभ्यासकांनी केलेल्या निरीक्षणाचे आणि चर्चेद्वारे मिळविलेल्या माहितीचे पृथःकरण व अर्थ निर्वचन केलेले आहे.

प्रकरण : ६ वे : या प्रकरणात संशोधकांचे अभ्यासाद्वारे निर्दशनास आलेले निष्कर्ष व शिफारशी आणि संशोधनाचा सारांश व पुढील संशोधनासाठी विषय दिले आहेत.

=-=-=-=-=-=-=